MHLA160000772009

**नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९**
**शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर**

## –:: नि.क्र.८२ लगत आदेश ::–

वादी आणि त्यांचे अधिवक्ता श्री. व्ही. एन. संकाये आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चे अधिवक्ता श्री. सोमवाड हजर आहेत. प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ राधाबाई यांना कारणे दाखवा नोटीस ही दि.०८/१२/२०२५ रोजी बजावलेली आहे. परंतु त्या हजर झालेल्या नाहीत. सबब त्यांच्या म्हणण्याशिवाय अर्ज पुढे चालविण्यात येतो. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ ते १० व १२ व १३ हे मागील तारखेला हजर झाले. परंतु त्यांनी म्हणणे देण्यास कसूर केला. सबब त्यांच्या म्हणण्याशिवाय अर्ज पुढे चालविण्यात येतो.

०२. प्रस्तावित प्रतिवादी क्र.८ काशिबाई निवृत्ती बालवाडे ह्या मयत असल्याबाबत बेलीफ अहवाल आहे आणि प्रतिवादीतर्फे वकील वाय.व्ही. स्वामी यांनी पुरसीस निशाणी ९२ दाखल केलेली आहे. सबब सदर अर्ज हा मयत व्यक्तिविरुध्द दाखल केलेला आहे. यथास्थितीत, सदर अर्ज मयत व्यक्तिविरुध्द चालविता येणार नाही. सबब तो मयत व्यक्तिविरुध्द बंद करण्यात येतो.

०३. वादी आणि प्रतिवादींनी सदर अर्जावर युक्तिवाद करावा.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.11 17:30:38 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ११–१२–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**